नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २१३ Issue - 213 | वार शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ Blow- Friday Date 20 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...

### गृहमंत्री अमित शहांच्या वक्तव्याविरोधात काँग्रेस आक्रमक; कामकाज तहकूब

नवी दिल्ली : संसदेच्या आवारातील गोंधळाचे तीव्र पडसाद गुरुवारी दोन्ही सभागृहांत उमटले. लोकसभेचे काम काज दुपारी तीन वाजल्यानंतर काही मिनिटांमध्ये तहकूब झाल्यावर काँग्रेसचे सदस्य लोकसभाध्यक्षांच्या आसनापर्यंत पोहोचले. आसनाच्या दुतर्फा उभे राहून त्यांनी 'जय भीम'च्या घोषणा दिल्या. सभागृह स्थगित झाल्यानंतरही काँग्रेसची घोषणाबाजी पाहून भाजपचे सदस्यही थबकले. लोकसभेचे कामकाज सुरू होण्याआधीच काँग्रेसचे सदस्य घोषणाबाजी करत होते. वर्षा गायकवाड यांच्याह इतर सदस्यांनी या वेळी 'जय भीम'च्या घोषणा देत असतानाच पीठासीन अधिकारी दिलीप सैकिया यांनी सभागृह तहकूब केले. तोपर्यंत काँग्रेसचे सदस्य आंबेडकरांच्या छायाचित्रांचे फलक घेऊन लोकसभाध्यक्षांच्या समोरील जागेत पोहोचले.

# संसदेबाहेर खासदारांमध्ये धक्काबुक्की; राहुल गांधींविरोधात गुन्हा

## खरगेंनाही धक्काबुक्की ?; मोदींकडून विचारपूस, भाजपच्या तक्रारीनंतर गांधींविरोधात गुन्हा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : लोकशाहीमध्ये सर्वोच्च स्थान असलेल्या संसद भवन परिसरात गुरुवारी भाजप आणि काँग्रेसच्या खासदारांनी नैतिकतेची पायरी सोडली. एकमेकांवर धक्काबुक्की, मारहाणीचे आरोप करताना हे प्रकरण पोलीस ठाण्यातही पोहोचले. धक्काबुक्कीत जखमी झालेल्या भाजपच्या दोन खासदारांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. भाजपने मारहाणीची तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी राहुल गांधींविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी केलेल्या कथित वादग्रस्त विधानावरून गुरुवारी 'इंडिया' व रालोआ या दोन्ही आघाड्यांतील सदस्यांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यामुळे संसदेच्या आवारातील वातावरण आधीच तापले होते. डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याशेजारी काँग्रेस व इतर विरोधक खासदारांनी शहांविरोधात निदर्शने केली. त्यानंतर हे सर्व खासदार घोषणाबाजी करत मकरद्वारासमोर आले. त्यावेळी तिथे भाजपचे खासदार आधीच काँग्रेसविरोधात निदर्शने करत होते. दोन्ही बाजूंचे सदस्य आंबेडकरांचे छायाचित्र घेऊनच घोषणाबाजी करत होते. यावेळी दोन्हीकडील खासदार एकमेकांना भिडले. या गोंधळात राहुल गांधींनी आपल्याला धक्काबुक्की केल्याचा आरोप भाजपचे खासदार प्रताप सारंगी यांनी केला.



सारंगी यांच्या चेहऱ्याला जखम झाली असून भाजपचेच मुकेश राजपूत यांनाही मुका मार लागला आहे. दोघांनाही राममनोहर लोहिया रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे. राहुल गांधींनी धक्काबुक्की केल्याचा आरोप फेटाळला. खाली कोसळलेल्या सारंगीची विचारपूस करण्यासाठी गेलो असता, 'तुम्हाला लाज वाटत नाही का', असा आरडाओरडा भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी केला. भाजपच्या खासदारांनीही राहुल गांधींशी हुज्जत घातली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सारंगी व राजपूत यांची विचारपूस केली. दोघांवर उपचार करणारे डॉ. अजय शुक्ला यांना थेट मोदींनी फोन केला. त्यानंतर खासदारांना 'चिंता करू नका' असेही पंतप्रधानांनी सांगितले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान व प्रल्हाद जोशी यांनीही रुग्णालयात जाऊन खासदारांची विचारपूस केली. लोकशाहीमध्ये हाणामारीला जागा नसल्याची प्रतिक्रिया राजनाथ सिंह यांनी यावेळी दिली.

भाजपच्या खासदारांनी पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगेंना धक्काबुक्की केल्याचा आरोप काँग्रेसने केला. मकरद्वारावर मला ढकलण्यात आले, माझा तोल गेल्यामुळे मी खाली पडलो, मला दुखापत झाली, असे खरगेंनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. त्यांनी लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनाही पत्र लिहून याबाबत तक्रार केली आहे.

''राहुल गांधी माझ्या अत्यंत जवळ येऊन उभे राहिले व त्यांनी घोषणाबाजी केली. त्यामुळे मी अत्यंत अस्वस्थ झाले,'' असा आरोप नागालँडच्या भाजप महिला खासदार फान्गनॉन कोन्याक यांनी केला. कोन्याक यांनी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना पत्र लिहून राहुल गांधींची तक्रार केली. राहुल गांधींचे वागणे अत्यंत असभ्य होते. त्यांच्या या वागण्यामुळे माझ्या मान-सन्मानाला धक्का लागला, असा आरोपही कोन्याक यांनी पत्रात केला आहे.

भाजप खासदार हेमंग जोशी यांच्यासह अनुराग ठाकूर आणि बांसुरी स्वराज यांनी दिलेल्या तक्रारीवरून संसद मार्ग पोलिसांनी रात्री उशिरा राहुल गांधींविरोधात गुन्हा नोंदविला. भारतीय न्याय संहितेच्या कलम ११७ (शारिरीक इजा पोहोचविणे), १३१ (गुन्हेगारी शक्तीचा वापर), ३५१ (धमकाविणे) आदी कलमांखाली हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# राज्यातील कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करा

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**



### छगन भुजबळ यांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

नाशिक : माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार छगन भुजबळ (उहहरसरप इर्हीक्षलरश्र) यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी ( झच् छरी-शपवीर चेवळ) यांना पत्र लिहलं आहे. मंत्रिमंडळातून वगळलं गेल्याने छगन भुजबळ नाराज आहेत. नाशिक या ठिकाणी त्यांनी समता परिषदेचा मेळावा घेतला आणि आपली भूमिका मांडली. दरम्यान छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना उद्देशून एक पत्र लिहिलं आहे.

मी आमदार होणं किंवा मंत्री होणं हे माझं काम नाही. मला मंत्रिपदाची हाव असती तर मी १६ नोव्हेंबरला राजीनामा देऊन १७ नोव्हेंबरला आलो नसतो. मी राजीनामा दिला होता पण उल्लेख केला नाही कारण मला तसे फोन सारखे येत होते. मी राजीनामा दिला होता हे मी अडीच महिन्यांनी सांगितलं. माझ्याविरोधात अर्वाच्य बोललं गेलं तेव्हा मी सांगितलं. प्रश्न फक्त मंत्रिपदाचा नाही तर अस्मितेचा आहे. एखाद्या समाजाला बरोबर घेऊन लढणारी माणसं आपल्याकडे आहेत. कुणीही दुःखात राहण्याचं कारण नाही. कभी डर न लगा मुझे फासला देखकर, मै बढता गया रास्ता देख कर, खुदही खुद नजदिक आती गयी मंजिल मेरा बुलंद हौसला देखकर, असं छगन भुजबळ यांनी नाशिकमध्ये कार्यकर्त्यांशी बोलताना म्हटलं होतं. त्यानंतर आता त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिलं आहे.

लाल कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे राज्यातील कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करण्यात यावे, अशी मागणी आपण देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी, केंद्रीय वाणिज्यमंत्री मा. पीयूषजी गोयल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तर महाराष्ट्रातील कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करण्यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

कांद्याच्या भावाचा परिणाम हा शेतकऱ्यांच्या जीवन मरणाशी निगडीत असून वेळोवेळी कांद्याच्या किमान निर्यात दरातील वाढीचा किंवा निर्यातबंदीचा जिल्ह्यातील कांदा निर्यातीवर विपरीत परिणाम होत आहे. आपल्या येवला मतदारसंघातील लासलगावमध्ये आशिया खंडातील कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असून येथून मोठ्या प्रमाणात कांदा निर्यात होते. सद्यस्थितीत उन्हाळ कांद्याचे उत्पादन संपले असून लाल कांद्याची बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आवक होत आहे, मात्र कांद्याचे दर घसरल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीतया आहे. आधीच बिगरमोसमी पाऊस व बदलत्या वातावरणामुळे त्रस्त असताना आता उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. लाल कांदा टिकाऊ नसल्याने तात्काळ विक्री करावी लागते, हेही नुकसानीचे महत्वाचे कारण आहे, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

शेतकऱ्यांचे हे नुकसान टाळण्यासाठी, राज्यातील शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव मिळणे गरजेचे असून राज्यात उत्पादित लाल कांद्याची (पान ४ वर...)

# कर संकलनात सुसूत्रता, पारदर्शकता आणणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

## 'जीएसटी' परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देणार

नागपूर : आपल्या देशाने 'एक देश एक कर' ही संकल्पना स्वीकारली आहे, त्याच माध्यमातून 'जीएसटी' करप्रणाली विकसित करण्यात आली आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक सवलती, अनुदानाच्या योजना राबविण्यात येत आहेत. जीवनावश्यक वस्तूंसह कृषीक्षेत्राशी निगडीत खते, बी-बियाणे, औषधांवरील 'जीएसटी'तून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारच्या 'जीएसटी' परिषदेच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानपरिषदेत 'जीएसटी'च्या अनुषंगाने सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिली. राज्यातल्या 'जीएसटी' कर संकलनात अधिक सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.



मा.उपमुख्यमंत्री,श्री.अजित पवार

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, देशातल्या एकूण कर संकलनापैकी १६ टक्के करसंकलन एकट्या महाराष्ट्रातून होते. देशांतर्गत एकूण कर संकलनात महाराष्ट्राचा वाटा सर्वात मोठा आहे. यामुळे राज्यातल्या 'जीएसटी' करप्रणालीत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. राज्याच्या सीमेलगतच्या भागातून होणारी कर चुकवेगिरीचे प्रकार थांबविण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येईल.

'महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम २००२ (सुधारणा) विधेयक, २०२४' आज विधानपरिषदेत मंजूर करण्यात आले. या विधेयकाच्या माध्यमातून राज्य शासनाचा महसूल वाढवण्यार भर देण्यात आला आहे. या विधेयकानुसार सध्याच्या महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मधील कलम ३७ नुसार वसुलीबाबत राज्याचा प्रथम भार विशिष्ट शर्तीच्या अधीन राहून होता. या विधेयकांच्या सुधारणेनुसार महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अंतर्गत विनाशर्त प्रथम भार स्थापित झाल्यानंतर जलद गतीने वसुली करणे शक्य होणार आहे.

तेल कंपन्यांकडून पेट्रोल व डिझेल खरेदी करुन व्यापारी खोल समुद्रात उभ्या असलेल्या बोटींना बॅरलद्वारे पुरवठा करतात. हा पुरवठा अन्य पेट्रोलपंपाद्वारे केल्या जाणाऱ्या पुरवठ्याप्रमाणे गृहीत धरुन कर भरणा करण्यापासून व्यापारी सूट घेतात.

या सुधारणेमुळे किरकोळ विक्री केंद्राची व्याख्या आणि किरकोळ विक्रीचे स्पष्टीकरण कायद्यात समाविष्ट होऊन कर चुकवेगिरीला रोखणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर या कायद्यातल्या कलम २ (२४) (पाच) या कलमामध्ये सुयोग्य स्पष्टीकरणाचा समावेश केल्यामुळे, एखाद्या संस्थेने किंवा क्लबने स्वतःच्या सदस्यांना केलेल्या विक्रीवर कर आकारणी शक्य होणार आहे.

## कल्याणच्या सोसायटीत तुफान राडा

### मारहाण झालेल्याची प्रकृती गंभीर, रुग्णालयात उपचार सुरु

# मराठी माणसं भिकारी, त्यांना मारा; म्हणत लोखंडी रॉडने मारहाण

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

मुंबई : कल्याणच्या खडकपाडा भागात अखिलेश शुक्ला नावाच्या एका सरकारी अधिकाऱ्याने अभिजित देशमुख या मराठी माणसाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. कल्याणच्या योगीधाम परिसरातील अजमेरा सोसायटीत ही घटना घडली आहे. अखिलेश शुक्ला यांनी अभिजित देशमुख यांना गुंड बोलवून मारलं आहे असा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत अभिजित देशमुख जखमी झाले आहेत आणि त्यांच्यावर मुंबईतल्या सायन रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

सरकारी नोकरी करणारे अखिलेश शुक्ला आणि वर्षा कळवीकट्टे हे योगीधाम सोसायटीत शेजारी राहतात. अखिलेश यांच्या पत्नी गीता या घराबाहेर देवपूजा करुन धूप लावतात. धूप लावल्याने वर्षा कळवीकट्टे यांच्या घरात हा धूर जातो, त्यांच्या घरात असलेल्या तीन वर्षांच्या बाळाला आणि वयोवृद्ध आईला दम लागतो. ही बाब वर्षा यांनी गीता यांना सांगितली. मात्र गीता यांनी वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांच्या बाजूला राहणारे अभिजित देशमुख आणि धीरज देशमुख यांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. ज्याचा राग शुक्ला यांना आला आणि त्यांनी काही लोकांना बोलवून या दोघांना मारहाण केली. या घटनेत अभिजित देशमुख गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरु आहेत.



कल्याणच्या खडकपाडा भागात योगीधाम परिरसरात अजमेरा सोसायटी आहे. त्या सोसायटीत अखिलेश शुक्ला आणि त्यांच्या शेजारी राहणारे देशमुख यांच्या धूप लावण्यावरुन आणि त्याचा धूर एकमेकांच्या घरांमध्ये जातो म्हणून या दोघांमध्ये शिवीगाळ आणि मारहाण झाली. मारहाणीमध्ये देशमुख नावाचे गृहस्थ जखमी आहेत. या प्रकरणी पुढील तपास आम्ही करतो आहोत. देशमुख यांची तक्रार होती त्याप्रमाणे एफआयआर दाखल केली आहे. तसंच शुक्ला यांच्या तक्रारीवरुनही एफआयआर दाखल करण्यात आली आहे. देशमुख जखमी आहेत त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहेत. सोसायटीच्या काही तक्रारी आहेत, मारामारीचा गुन्हा दाखल आहे असं पोलिसांनी सांगितलं. शुक्ला हे सरकारी नोकरीवर आहेत ते काय काम करतात त्याची चौकशी करण्यात येते आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांनी ही माहिती दिली.


विजय कळवीकट्टे याच सोसायटीत राहतात, त्यांनी माध्यमांना सांगितलं, मी माझ्या घरात बसलो होतो. त्यावेळी शुक्ला यांनी अभिजित देशमुख यांची खोली काही माणसांना दाखवली ज्यानंतर त्यांनी सायकल उचलून दारात आपटली. मी काय झालं बघायला आलो तेव्हा त्यांनी अभिजित देशमुख यांना रॉडने सात ते आठ माणसांनी मारायला सुरुवात केली. मी अडवायला गेलो तर मलाही मारलं आणि बाजूला केलं. महिलांनाही मारहाण केली. तसंच मराठी माणसं भिकारी आहेत त्यांना मारा असंही ते शिवीगाळ करत म्हणत होते. अभिजित देशमुख यांना दहा ते बारा टाके पडले आहेत इतकं मारण्यात आलं आहे. तसंच ठार मारण्याची धमकीही देण्यात आली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल मनसेनेही घेतली आहे.

योगीधाम भागातल्या किरकोळ वादावरुन भांडणं झाली. शुक्ला आणि कळवीकट्टे कुटुंबात दिवा आणि धूप लावण्यावरुन वादावादी झाली. त्यांचा वाद सोडवण्यासाठी देशमुख गेले होते. त्यांना इतकं मारलं आहे की त्यांची प्रकृती गंभीर आहे. देशमुख कुटुंबासह आम्ही म्हणजेच मनसे उभी आहे. जर २४ तासांत या प्रकरणी आरोपींना अटक केली नाही तर आम्ही रस्त्यावर उतरणार आणि आंदोलन करणार असा इशारा उल्हास भोईर यांनी दिला आहे.

# अपघातात दुचाकीवरील महिलेसह दोघांचा मृत्यू

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

सोलापूर : एका भरधाव मोटारीने समोरून ठोकल्यामुळे घडलेल्या अपघातात दुचाकीवरील दोघा जणांचा मृत्यू




झाला, तर अन्य एक जखमी झाला. बार्शी-येरमाळा मार्गावर पाथरी (ता. बार्शी) गावच्या शिवारात हा अपघात झाला.

सारिका नितीन चव्हाण (वय ३२, रा. गुंडेगाव, जि. अहिल्यानगर) आणि महामुनी ऊर्फ बटऱ्या गुलच्या काळे (वय ४०, रा. वालवड, ता. भूमी, जि. धाराशिव) अशी या अपघातातील दोघा मृतांची नावे आहेत. या अपघातात रवींद्र बाबूराव चंद्रवंशी (रा. नायगाव, ता. हवेली) हा जखमी झाला.

सारिका चव्हाण आणि महामुनी काळे हे चंद्रवंशी याच्यासह येरमाळा येथील एका साखर कारखान्यासाठी ऊसतोड करीत असलेल्या बहिणीस भेटण्यासाठी दुचाकीवर बसून निघाले होते. बार्शी-येरमाळा रस्त्यावर पाथरी गावच्या शिवारात समोरून येणाऱ्या भरधाव मोटारीची धडक बसल्याने दुचाकीवरील सारिका आणि महामुनी या दोघांचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. या संदर्भात मोटारचालक हनुमंतराव शेषराव शिंदे (रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड) याच्याविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# अन्नत्याग उपोषणाच्या पाचव्या दिवशी कैलास नागरे यांची प्रकृती खालावली

## ठोस आश्वासनाशिवाय माघार नाही, प्रकृती खालावली असतानाही कैलास नागरे उपोषणावर ठाम

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :देऊळगाव राजा तालुक्यातील शिवनी आरमाळ येथे मोठा पाणी साठा असलेले लघु पाटबंधारे विभागाचे धरण आहे.या धरणामध्ये परिसरातील अंढेरा,गुंजाळा,मेंडगाव,अंचरवाडी,असोला,बायगाव, मेंडगाव, सावखेड नागरे,पाडळी शिंदे या गावाच्या शिवारातुन खडकपूर्णा प्रकल्पाचा पाट गेलेला आहे.जर या प्रकल्पाचे पाणी शिवारातून गेलेल्या पाटा मधून धरणात सोडल्यास पाच गावाची संपूर्ण शेती सिंचनाखाली येवू शकते अशा मागणीसाठी शिवनी आरमाळ येथील कैलास अर्जुन नागरे या शेतकऱ्याने थंडीची पर्वा न करता प्रकल्पाच्या भीती जवळ पाच दिवसा पासून अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे. या उपोषणास पाचवा दिवस उजाडला असल्याने उपोषण कर्त्याची प्रकृती चांगलीच खालावली आहे.असे असताना मात्र अद्यापही प्रशासनाने झोपेचे सोंग घेवून दुर्लक्ष केले असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले होते. मात्र दे राजा तहसिलदार डोंगरजाळ मॅडम यांनी भेट दिली.गुंजाळा,अंढेरा,शिवणी आरमाळ,बायगाव या गावाच्या शेतकऱ्यांची




### देऊळगाव राजा तहसीलदार डोंगरजाळ यांची उपोषण स्थळाला भेट

शेत जमीन सिंचनाखाली यावी मुद्द्यावर कैलास नागरे अधिकच आक्रमक झाले असून आता मागे हटणार नाही,असे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या उपोषणाचा आज पाचवा दिवस असून त्यांची प्रकृती चांगलीच खालावली आहे. त्यांच्यासाठी शिवणी आरमाळ परिसरातील समर्थकांनी रात्रभर जागून त्यांना साथ दिली.प्रकृती खालावत असल्याने स्थानिक पत्रकारांनी उपोषण मंडपाला भेटी दिल्या आणि विनंती केली की थंडीचे दिवस आहेत प्रकृती सांभाळा जीवाचे बरेवाईट होवू शकते. त्याचं बरोबर महिला या उपोषणस्थळी दाखल झाल्या आहेत. सर्वांनीच त्यांना पाणी व उपचार घेण्याची विनवणी केली होती. मात्र, त्यांनी स्पष्ट नकार दिल्यामुळे उपस्थित पत्रकार व महिला वर्ग भावूक झाले आहेत हा प्रकार पाहुन परिसरातील जनतेचा ओघ वाढत चालला असून नागरे यांच्या प्रकृतीबद्दल चिंताही व्यक्त केली जात आहे.

एकीकडे थंडीचे दिवस असून या कडाक्याच्या थंडीमध्ये गेल्या पाच दिवसापासून अन्नत्याग आमरण उपोषण सुरू केले असतांना संबंधित विभागाच्या एकाही अधिकाऱ्यांनी आमरण उपोषणाला आजपर्यत भेट सुद्धा दिली नव्हती परंतु पत्रकार येताच दे राजा तहसिलदार डोंगर जाळ मॅडम यांनी उपोषण कर्त्यास भेट देवून आश्वासन दिले की सर्व मागण्या वरिष्ठाकडे पाठवून लवकरात लवकरच बैठक बोलावून प्रश्न मार्गी लावू पण आपण उपोषण मागे घ्यावे असे सांगितले पण जर मागण्या न झाल्यास आणि उपोषण कर्त्याच्या जिवाचे बरेवाईट झाल्यास याला संबंधित विभागाचे अधिकारी जबाबदार धरण्यात येईल असे नागरिकांकडून ओरड होत आहे.

यावेळी देऊळगाव राजा तहसीलदार डोंगरजाळ मॅडम,अभियंता शिंदे,मंडळ अधिकारी केदार,तलाठी शेटे,आकाश खरात,पत्रकार प्रताप मोरे,ऋषीं भोपळे,दिलीप वनवे,कैलास आंधळे,सुनील अंभोरे,नंदकिशोर देशमुख आदी पत्रकार तसेच नागरिकांची उपस्थिती होती.

## संपादकीय....

### संसदेबाहेर आखाडा

सध्या दिल्लीत संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. काल अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या विधानानंतर काँग्रेससह इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसद परिसरात आंदोलन केले होते. त्यावेळी संसदेच्या मकरद्वारापाशी काँग्रेस आणि भाजपा आमदार आमने-सामने आले. त्यानंतर दोन्ही पक्षांच्या खासदारांमध्ये धक्काबुक्की झाली यामध्ये भाजपाचे ओडिशातील खासदार प्रताप चंद्र सारंगी आणि खासदार मुकेश राजपूत जखमी झाले होते. दरम्यान राहुल गांधींनी दुसऱ्या एका खासदाराला धक्का दिल्यामुळे आपल्याला जखम झाल्याचा आरोप प्रताप चंद्र सारंगी यांनी केली आहे. त्यानंतर आता भाजपाने दिल्लीतील संसद मार्ग ठाण्यात राहुल गांधी यांच्याविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली आहे. याबाबत अनुराग ठाकूर यांनी माहिती दिली आहे. भाजपा खासदार अनुराग सिंह ठाकूर, खासदार बन्सुरी स्वराज आणि हेमांग जोशी यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात कलम १०९, ११५, ११७, १२५, १३१ आणि ३५१ नुसार संसद मार्ग पोलीस ठाण्यात स्टेशनमध्ये भाजपा खासदारांना धक्का देऊन जखमी केल्याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. याबाबत एएनआय या वृत्तसंस्थेने एक्सवर माहिती दिली आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर म्हणाले की, आम्ही राहुल गांधींविरुद्ध प्राणघातक हल्ला आणि धमकी दिल्याबद्दल दिल्ली पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. आज मकरद्वारच्या बाहेर घडलेल्या घटनेची संपूर्ण माहिती आम्ही तक्रारीत दिली आहे. यामध्ये हत्येच्या प्रयत्न केल्याच्या तक्रारीचाही समावेश आहे. सकाळी मकरद्वारापाशी झालेल्या झक्काबुक्कीनंतर प्रताप सारंगी आणि मुकेश राजपूत या दोन्ही खासदारांना तातडीने दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांच्या म्हणण्यानुसार, सारंगी आणि राजपूत या दोघांच्या डोक्याला दुखापत झाली असून त्यांना आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. सारंगी यांच्या डोक्यात दुखापत झाली असून, त्यांच्या कवटीला खोल जखम झाली आहे.

## कुरडगाव येथून मुलगी बेपत्ता

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी

निफाड तालुक्यातील कुरडगाव येथील रहिवासी बाळू सुखदेव बर्डे यांची पंधरा वर्षे नऊ महिन्याची मुलगी कु. रोहिणी बाळू बर्डे या अल्पवयीन मुलीस तिच्या राहत्या घरातून सायंकाळच्या वेळी अज्ञात व्यक्तीने फुस लाउन पळवून नेल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे, या घटनेची रीतसर माहिती तिचे वडील बाळू बर्डे यांनी निफाड पोलीस स्टेशनला दिले असून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे ,

कुरडगाव येथील रहिवासी बाळू सुखदेव बर्डे हे मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात त्यांना तीन मुली व एक मुलगा पत्नी आई असे कुटुंब आहे , दिनांक ३/१२/२०२४ रोजी मुलांना घरी एकटे सोडून बर्डे हे पत्नीला सोबत घेऊन गावातच ऊस तोडीच्या कामाला गेले होते, सायंकाळी साडेपाच ते सात वाजेच्या दरम्यान कु. रोहिणी



बाळू बर्डे हिला अज्ञात व्यक्तीने पळवून नेले तिचा सर्वत्र शोध घेतला परंतु ती सापडली नाही, कु. रोहिणी ही अंगाने सडपातळ असून रंगाने सावळी आहे ,चेहरा गोल ,नाक सरळ तर डोळे काळे आहेत ,अंगात सफेद रंगाचा टॉप व पॅन्ट असून पायात लाल रंगाची चप्पल आहे ,वरील वर्णनाची मुलगी कोणाच्याही नजरेस आल्यास निफाड पोलीस स्टेशनला या नंबर वर (.०२५५०/२४१०३३) संपर्क साधावा तसेच पुढील तपास पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवा. किरण ढेकळे( मो.८६२४८०७१३१) हे करीत आहे.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात इस्त्रो अंतरिक्ष महायात्रेचे भव्य स्वागत

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तसेच मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या वतीने इस्त्रो अंतरिक्ष महायात्रेचे स्वागत करण्यात आले.




प्रारंभी इस्त्रो बसची ( डरलिशप थहशशश्री) शाळेच्या गेटपासून मिरवत बँड, लेझीम पथकसह कॉलेजची मुले- मुली वाजत गाजत स्वागत झाले. त्यानंतर संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते फीत कापून विविध अंतराळ संशोधन मॉडेल्स चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी,सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते. त्यानंतर ५ वी ते १२ वी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी सदर अंतराळ संशोधनाचे मॉडेल्स, पोस्टर्स व व्हिडिओ पाहिले.

इस्त्रो अंतरिक्ष महायात्रेतील प्रदर्शन पाहण्यासाठी शहरातील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांनी गर्दी केले होते. त्यात शहाजी हायस्कूलचे २५० विद्यार्थी, श्री मंगरुळे हायस्कूल चे १२० विद्यार्थी, राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेचे १२५ विद्यार्थी, तारामाता हायस्कूलचे ६० विद्यार्थी याशिवाय अनंत चैतन्य प्रशाला हन्नूर येथील २२५ विद्यार्थी या प्रदर्शनाचा लाभ घेतला.

सदर प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी या प्रशालेतील पर्यवेक्षक सूर्यकांत रूगे, दिगंबर जगताप, कल्पना स्वामी, पूजा कडबगावकर , श्रीदेवी मायनाळे, सिद्रामप्पा पाटील, रविकिरण दंतकाळे, राजकुमार गवळी, शरणबसप्पा चानकोटे, मनीषा दूधभाते, सागर मठदेवरू, निशिगंधा कोळी, विद्या बिराजदार आदी शिक्षक परिश्रम घेतले.

### महाराष्ट्र आता थांबणार नाही...



**सोबत राहू एकदिलाने,**
**घडवू महाराष्ट्र पुन्हा नव्याने,**
**समृद्धीचा वेग कुणी रोखणार नाही,**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**उद्योग, गुंतवणूक येतेय जोमात**
**बेरोजगारांना देऊ रोजगाराची साथ**
**तरुणाईचं स्वप्न कधी भंगणार नाही,**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**रस्ते, पूल, रेल्वेचे धागे,**
**सुखदायी प्रवासाचे स्वप्न होईल जागे,**
**गतीला स्थगिती मिळणार नाही,**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**विकासाच्या स्वप्नांसोबत सेतू अटल**
**मुंबईच्या वेगासाठी आहे कोस्टल**
**मराठी माणसाचे स्वप्न भंगणार नाही,**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**जलयुक्त शिवार देईल नवजीवन,**
**नदीजोड प्रकल्प फुलवतील नंदनवन**
**राज्यात दुष्काळ कुठे दिसणार नाही**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**पाणंद रस्त्यांनी जोडू शेतशिवार**
**आनंदाचा शिधा देईल आधार**
**उपाशी पोटी कुणी झोपणार नाही,**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**लाडक्या बहिणींना मिळाला स्वाभिमान**
**ज्येष्ठांना मोफत प्रवासातून सन्मान**
**लाडक्या लेकी कधी दुःखी होणार नाही**
**अन् महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

**असेल विरोधकांचे कमी संख्याबळ,**
**सारे टिकवून ठेऊ लोकशाहीचे बळ**
**कोणत्याही आमदाराचा मानसन्मान घटणार नाही**
**महाराष्ट्र आता थांबणार नाही...**

( साभार, विधानसभा, नागपूर । दि. १९ डिसेंबर २०२४)

**नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान**

**आपली पत्रकारिता 'रिअलटाईम' करण्यासाठी 'एआय' उपयुक्त**

# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक : प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणाऱ्या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरीत्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.




श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोकऱ्या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोकऱ्या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत 'एआय' ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणाऱ्या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रिम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धर्मेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# उजनी धरणावर पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबत आमदार अभिजीत पाटील यांनी उठवला आवाज

## सीना-माढा उपसा सिंचनावर तुळशी, बावीसह अनेक गावाचा पाण्याच्या गंभीर प्रश्नाचा आवाज पोहचविला विधानभवनात; तुळशीतील सामुदायिक विवाह सोहळ्याचे थेट अध्यक्षांनाच आमंत्रण; सलग दुसऱ्या दिवशी विधिमंडळात आ. अभिजीत पाटील यांचा आवाज घुमला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा/प्रतिनीधी : माढा विधानसभा मतदारसंघाचे नुतन आमदार अभिजीत पाटील यांनी आपल्या मतदारसंघाचा विकास साधण्यासाठी सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून मागील दोन दिवसापासून नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचा माढा मतदारसंघातील विविध प्रश्नांवर आवाज उठवण्याचे काम आमदार अभिजीत पाटील यांचे कडून सुरू आहे. मतदार संघातील विविध विकासकामांची मुद्देसुर मांडणी करीत आमदार अभिजीत पाटील यांचेकडून विविध विकास कामांची मागणी केली जात आहे.



माढा विधानसभा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील यांनी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही आपल्या मतदार संघांपैकी अनेक प्रलंबित आणि महत्वाच्या प्रश्नावर आवाज उठविला आहे. यामध्ये माढा शहरातील पाण्याची पाईपलाईन खराब असल्याने वर्षभरातील ३६५दिवसातील अवघ्या ३१दिवस पाणी पुरवठा केल्याचे निदर्शनास आणून देत. या पाईपलाईन दुरुस्तीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

उजनी धरणापासून जवळ असलेल्या आलेगाव आणि सुस्ते गावाजवळ बंधारे बांधण्यात येणार असल्याचे आश्वासन पालकमंत्री म्हणुन ना.चंद्रकांत पाटील यांनी २०१९ साली आश्वासन दिले होते. त्याचे पुढे काय झाले. याबाबतची आठवण करून देत याठिकाणी बंधारे बांधण्यात यावेत आशी मागणी आमदार अभिजीत पाटील यानी केली आहे.

याशिवाय उजनी धरणाचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्याची ही त्यांनी आग्रही मागणी करून पुणे जिल्ह्याच्या सीमेवर असणारे हे धरण जर पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित झाले तर सुट्टीच्या दिवशी या ठिकाणी पर्यटकांची गर्दी वाढून मोठ्या प्रमाणात अर्थकारणाला गती येईल ही बाब त्यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिली. विशेष म्हणजे या कामास मंजुरी मिळाली असून सदर काम त्वरित हाती घ्यावे अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय उजनी धरणामध्ये मत्स्यबीज सोडले जात नाही, त्यामुळे मासेमारी करणाऱ्या व्यावसायिकांची अडचण होते. यासाठी दरवर्षी पुरेशा प्रमाणात मत्स्यबीज उजनी धरणात सोडले जावे याचीही मागणी श्री. अभिजीत पाटील यांनी आज विधिमंडळामध्ये केली.

### तुळशीतील सामुदायिक विवाह सोहळ्याचे थेट अध्यक्षांनाच आमंत्रण

**माढा तालुक्यातील आलेगाव, सुस्ते येथील बंधाऱ्याची कामे त्वरित पूर्ण करण्याची ही मागणी त्यांनी केली. तालुक्यातील तुळशी, बावी, परिते, जाधवाडी, बैरागवाडी या गावांनाही उजनीचे पाणी अद्याप मिळाले नाही. तसेच तुळशी गावात पाण्याची सोय नाही म्हणून येथील तरुणांची लग्न जमत नाहीत, असे सभागृहाला सांगून अभिजीत पाटील यांनी जर तुळशी गावाला पाणी दिले तर या गावात सामुदायिक विवाह सोहळा घडवून आणून खुद्द विधानसभेच्या अध्यक्षांनाच त्यासाठी आमंत्रित केले जाईल अशी ग्वाही त्यांनी सभागृहाला दिली. शिवाय मानेगाव उपसा सिंचन योजनाही पूर्णत्वास न्यावी याची आग्रही मागणी अभिजीत पाटील यांनी यावेळी केली. पंढरपूर तालुक्यातील करकंब येथील शिवकालीन तलावात देखील उजनीचे पाणी सोडण्याची व्यवस्था व्हावी यासाठी त्यांनी मागणी केली.**

**सलग दुसऱ्या दिवशी प्रश्न मांडण्याची संधी मिळाल्यानंतर त्या संधीचे सोने करताना आमदार पाटील यांनी प्रचारादरम्यान मतदारांना दिलेली सर्व आश्वासने पूर्ण करण्याच्या दृष्टीने अभ्यासपूर्ण मांडणी ते विधिमंडळात करत आहेत. नवख्या आमदाराकडून असे जनतेची निगडित असणारे प्रश्न मांडले जात असल्यामुळे माढा मतदारसंघातील जनतेकडून ही त्यांच्या या भूमिकेचे जोरदार स्वागत होत आहे.**

## थोडक्यात...

### कंटेनरची दुचाकीला धडक; चालकाविरुद्ध पुन्हा

सोलापूर : जोडभावी पेठ चौकी येथे कंटेनरने दुचाकीला धडक दिल्याची घटना १८ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी मल्लिनाथ तमन्नाप्पा चारगमोळ (वय-६१, रा. ७२१ उत्तर कसबा, बाळी-वेस) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

यात अधिक माहिती अशी की, फिर्यादीचा लहान मुलगा व त्याचा मित्र नागेश पाटील हे होंडा पॅशन मोटरसायकल (क्रमांक एमएच १३ एई ९५६७) वरून डबल सीट मार्केटिंग करून आले. अशोक लेलँड कंपनीचा कंटेनर (क्रमांक एच आर ५५ एआर ९९९८ याने दुचाकीला धडक दिल्याने संतोष चारगमोळ हा जखमी झाला असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोह.रुपनर हे करीत आहेत.

### एसटी बसमध्ये चढताना मोबाईल पळवला

सोलापूर : एसटी स्टँड येथे मंद्रूपला जाणाऱ्या एसटीमध्ये चढताना अज्ञात चोरट्याने खिशातील सॅमसंग कंपनीचा गॅलेक्सी ए फोर मॉडेलचा मोबाईल चोरून नेल्याची घटना १४ ऑक्टोबर रोजी घडली. याप्रकरणी रावसाहेब अण्णाप्पा चव्हाण (वय-३९,रा.नाई नगर,मंद्रूप,ता.दक्षिण सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोह.परीट हे करीत आहेत.

# वाखरी येथे संत बाळूमामा भंडारा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील वाखरी ग्रामपंचायत येथील ५२ एकर येथे श्री संत बाळूमामा मंदिर असून येथे तीर्थक्षेत्र आप्पाचीवाडी कुरली व मेटके येथे भावनुक सांगणारे भगवान महाराज ढोणे व सिद्धार्थ महाराज यांच्या भावनुकीबरोबर भंडारा व तसेच नाथांचा दरबार या कार्यक्रमाचे आयोजन ५२ एकर वाखरी येथील बाळूमामा ठाण्याची आप्पा महाराज माने कैकाडी स्नेह परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.



या कार्यक्रमाची सुरुवात प्रथम भगवान डोले महाराज व सिद्धार्थ महाराज यांच्या हगमनानंतर पालखी सोहळा मिरवणुकीचे सुरुवात करण्यात आली हा पालखी सोहळा पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी विसावा मंदिर येथे प्रदक्षिणा घेऊन नंतर बाळूमामा ठाणा येथे आल्यानंतर दोन्ही महाराज मंडळी यांचे भाकणूक कार्यक्रम संपन्न झाला आरती नंतर नाथांचा दरबार भंडारा महाप्रसाद झाला तसेच या ठिकाणी आज सामाजिक हित डोळ्यासमोर ठेवून येथील भक्तांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर कार्यक्रमातही यावेळी आयोजन करण्यात आले होते व रक्तदान केलेल्या सर्व भाविक भक्तांचे अक्षय ब्लड बँकेच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.



# श्री माणकेश्वर वाचनालयाच्या उर्वरित कामाचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/ प्रतिनिधी : निफाड शहर व परिसराची वाचन संस्कृती जोपासणारे तसेच १०५ वर्षांची समृद्ध परंपरा असलेल्या श्री माणकेश्वर वाचनालयास निफाड चे आमदार दिलीपकाका बनकर यांच्या निधीतून ३० लाख मंजूर करण्यात आले असून प्रत्यक्ष वाचनालयाच्या उर्वरित कामकाजाचा शुभारंभ निफाड चे माजी सरपंच रघुनाथ भाऊ कुंदे, माजी उपसरपंच दिलीप आबा कापसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे निफाड शहर अध्यक्ष तथा विद्यमान संचालक तनवीर राजे यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघाताई जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणी दत्ता काका उगावकर, संचालिका सुजाता तनपुरे, संचालक सुनील चिखले साहेब यांसह ऋषिकेश वाघ, निशांत कहाणे, कर्मचारी श्रीमती विद्या बंद्रे, नितीन बनसोडे, अनिता इस्ते, नंदू पुंड आदी उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून संजयकुमार पुजारी यांना पीएचडी प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून श्री संजयकुमार शांतमल पुजारी यांना पी एच डी प्रदान केले.

५ डिसेंबर रोजी पुजारी यांनी पदार्थ विद्यानशाखेतून सिंथेसिस ऑफ रुथेनियम डोपड ओयर्न ऑक्सीइड थीम फिल्म्स बाय सिलार अँड इट्स सुपर कॅपेशींटिव्ह कॅरेकटआइझेशन विषयात आपले शोधनिबंध सादर केले.

यावेळी बहिस्थ परीक्षक म्हणून वरिष्ठ प्राध्यापक:डॉ. आर. एस. माने (स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ नांदेड) हे उपस्थित होते.

सदर विषयात गाईड प्रा. बी. जे. लोखंडे ( संचालक पदार्थ विज्ञान संकुल) पू.अ.हो सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली वरील शोध निबंध पूर्ण केले आहेत.



मूळचे अक्कलकोट तालुक्यातील बोरी उमरगे गावचे रहिवाशी असून त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झाले आहे सद्या शासकीय महाविद्यालय मादन हिप्परगा येथे सहायक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

वरील विषयात पी एच डी पदवी प्राप्त करून यश संपादन केल्यामुळे प्राचार्य डॉ. बसवन्तराव पाटील व सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## स्वेरीत 'ऋणानुबंध २०२४' संपन्न

### डॉ. बी. पी. रोंगे यांनी 'जिद्द,कठोर मेहनत आणि डिसिप्लीन यांच्या माध्यमातून जीवनात यश कसे मिळवले जावू शकते'यावर टाकला प्रकाश

# शिक्षणाबरोबरच उत्तम करिअर करण्यासाठी स्वेरीला प्राधान्य : डेप्युटी जनरल मॅनेजर अबीद शाहबाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर:'स्वेरी हे नाव केवळ जिल्हा नव्हे, राज्य नव्हे, तर जगविख्यात झाले आहे कारण स्वेरीतून शिक्षणाबरोबरच संस्कार घडतात. स्वेरीतील शिस्त जीवन यशस्वी करण्यासाठी उपयोगी पडते. स्वेरीच्या शिस्त आणि नियमांना माझा सलाम असून या शिस्तीमुळे माझी करिअरची रेल्वे सुरळीत धावत आहे. माझे शिक्षण अशा ठिकाणी झाले की क्लास, वर्कशॉप, प्रयोगशाळा आणि लायब्ररी हे सर्व एकाच ठिकाणी व्हायचे. डॉ. रोंगे सरांच्या शिस्तीमुळे आत्ताच्या विद्यार्थ्यांसाठी भव्य इमारत आणि सर्व सुविधा उपलब्ध आहेत. आता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वेरीतून उत्तम प्रकारे शिक्षण मिळत आहे. स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच संस्कार देखील मिळत आहेत म्हणून विद्यार्थी व पालक शिक्षणाबरोबरच उत्तम करिअर करण्यासाठी स्वेरीला प्रथम प्राधान्य देतात'असे प्रतिपादन स्वेरीच्या २००४ च्या बॅचचे विद्यार्थी व थायसन ग्रुप कंपनीचे डेप्युटी जनरल मॅनेजर अबीद शाहबाद यांनी केले.

पंढरपूर येथील स्वेरी अभियांत्रिकी, फार्मसी व एमबीए, एमसीए या मधून शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा'ऋणानुबंध २०२४'हा मेळावा स्वेरीच्या सभागृहात नुकताच पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्वेरीच्या पदवी अभियांत्रिकीचे माजी विद्यार्थी व थायसन ग्रुप कंपनीचे डेप्युटी जनरल मॅनेजर अबीद शाहबाद हे मार्गदर्शन करत होते. महाराष्ट्र गीत, स्वेरी गीत व दिपप्रज्वलनानंतर स्वेरी अभियांत्रिकीच्या ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट चे अधिष्ठाता व माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव प्रा. ए. ए. मोटे यांनी मेळावा आयोजित करण्याचा हेतू सांगून माजी विद्यार्थी संघटनेच्या यशस्वी वाटचालीबद्दल माहिती सांगितली. या मेळाव्यात कोणी प्रशासकिय अधिकारी, कोणाची स्वतःची कंपनी, कोणी परदेशात स्थायिक, काही जण प्राध्यापक,कोणी उद्योजक,तर काहीजणी गृहिणी झाल्या होत्या. हे सर्वच जण'माजी विद्यार्थी मेळाव्या'च्या निमित्ताने स्वेरीत एकत्रित आले होते. यावेळी माजी विद्यार्थी आपल्या भावना,वाटचाल व आजपर्यंतचा प्रवास, त्याला स्वेरीमुळे आलेले यश या बाबी शब्दात सांगत होते.'हार्ड वर्क'शिस्त व संस्कार या स्वेरीमधून मिळालेल्या शिदोरीमुळे आपण जीवनात यशस्वी होत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. ज्यावेळी कंपनीत नोकरीकरिता रुजू झालो त्यावेळी स्वेरीतून अंगीकारलेली शिस्त व प्राध्यापकांनी आमच्यावर केलेले अनमोल संस्कार यांचा आज खूप फायदा होत आहे. त्यामुळे स्वेरीच्या अभ्यासपूरक वातावरण व जागतिक स्तरावर रुजवलेल्या शिस्तीचा फायदा कसा होतो?हे पटवून दिले. फार्मसीच्या २०१४ च्या बॅचचे विद्यार्थी सुरज देशमाने म्हणाले की, 'स्वेरीतून हार्ड वर्कचे शिक्षण मिळाल्यानंतर त्या विद्यार्थ्याला करिअर करताना फारसा अडथळा येत नाही. परिश्रम कसे करायचे व आपल्या कामात एकाग्रता कशी राखायची? याचे शिक्षण स्वेरीमधून मिळाले. त्यामुळे मी जीवनात यशस्वी होत आहे.स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी 'जिद्द,कठोर मेहनत आणि डिसिप्लीन यांच्या माध्यमातून जीवनात यश कसे मिळवले जावू शकते'यावर प्रकाश टाकला. माजी विद्यार्थ्यांसमवेत त्यांनीमनमोकळेपणाने संवाद साधला. माजी विद्यार्थी संघटना विविध प्रकारे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी आणि स्वेरीच्या जडणघडणीत मोलाचा सहभाग नोंदवत आहेत. माजी विद्यार्थी स्वेरीला वेळोवेळी भेट देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात, याचबरोबर विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळण्यासाठी मदत करतात. यावेळी डिप्लोमा फार्मसीच्या माजी विद्यार्थिनी व एव्हर टोझन फार्मा कंपनीतील प्रिती अवचर, अॅड. सुर्यकांत भोसले, पहिल्या बॅचचे विद्यार्थी आसिफ खतीब,पदवी अभियांत्रिकीच्या माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर यांच्यासह काही माजी विद्यार्थ्यांनी प्रतिक्रिया व्यक्त करून भावना मांडल्या. याचबरोबर त्यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून वर्षभरात होणाऱ्या सर्व उपक्रमाचा आढावा सांगितला. त्याचबरोबर माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने स्वेरीच्या पदवी अभियांत्रिकी मधील टॉपर्स विद्यार्थ्यांना सुवर्णपदकाने गौरवण्यात आले. यावेळी संस्थेचे विश्वस्त एच.एम. बागल, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मनियार, डिप्लोमा चे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, तसेच फार्मसी, अभियांत्रिकीच्या व एमबीएच्या स्थापनेपासून ते गतवर्षी उत्तीर्ण झालेले जवळपास ४०० हून अधिक विद्यार्थी,प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले तर स्वेरीच्या पदवी अभियांत्रिकीच्या माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष दत्तात्रय घोडके यांनी आभार मानले.




**स्वेरीत माजी विद्यार्थ्यांचा मेळावा'ऋणानुबंध २०२४'संपन्न झाला यावेळी डावीकडून आसिफ खतीब, विश्वस्त एच.एम. बागल, अॅड. सुर्यकांत भोसले, डॉ. एम.जी.मनियार, प्रा. एस.व्ही.मांडवे, सुरज देशमाने, दत्ता घोडके, डेप्युटी जनरल मॅनेजर अबीद शाहबाद, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, प्रिती अवचर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गुरुप्रसाद तेलकर,संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगेसोबत माजी विद्यार्थ्यांसोबत हितगुज साधताना संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे.**

## थोडक्यात...

### पादचारी महिलेस दुचाकीस्वाराने ठोकरले

सोलापूर : मार्केट यार्ड येथून दळणाची पिशवी घेऊन जाणाऱ्या महिलेला दुचाकी (क्रमांक एम एच १३ एजी ८६४१ या चालकाने धडक दिल्याची घटना १३ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी बसन्ना शिवराय बेल्लुयाळ (वय-५४, रा. १७ ऋषिकेश नगर, हैदराबाद रोड) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्यांच्या फिर्यादीवरून दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यात अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांच्या पत्नी बस्सामा संगम नगर येथून दळणाची पिशवी घेऊन घराकडे रस्ता ओलांडताना समोरून आलेल्या दुचाकी स्वाराने हयगयीने व निष्काळजीपणाने दुचाकी चालवून फिर्यादी यांच्या पत्नीस धडक देऊन जखमी करून मोटरसायकल तेथेच सोडून पळून गेला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेच्या पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल साळुंखे हे करीत आहेत.

### माहेरून पैसे आण म्हणत विवाहितेचा छळ; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

सोलापूर : घराच्या बांधकामासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये असे म्हणून हुंड्याची मागणी केली.पैसे दिले नाही तर तुला नांदायला घेऊन जाणार नाही अशी धमकी देत शारीरिक व मानसिक छळ केल्याची घटना १३ नोव्हेंबर २०२२ ते १३ नोव्हेंबर २०२४ दरम्यान फिर्यादीच्या सासरी घडली.याप्रकरणी जैनब तोहिद शेख (वय-२२, रा.१३७ न्यू कालिका नगर, शेजारी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती तोहिद, सासरे अशपाक,सासू अंजुम,ननंद शाहिस्ता पानगल,ननंद मुस्कान पानगल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास पोह.सोनार हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने ८० हजारांचा ऐवज पळवला

सोलापूर : सोलापूर-पुणे हायवे लगत सोलापूर टेक्स्टाईल समोर असलेल्या शेत जमिनीमधून ३१५ केवीए विद्युत रोहित्राच्या आतील चारशे लिटर ऑइल व तांब्याचे धातूचे २०० कॉइल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ६ डिसेंबर रोजी घडली. याप्रकरणी भीमाशंकर शिवशंकर पटणे (वय-७५, रा.बुधवार पेठ, सम्राट चौक) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोह.आरेनवरु हे करीत आहेत.

### राज्यातील कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करा

(पान १ वरून...) परदेशात जास्तीत जास्त निर्यात होणे आवश्यक आहे. त्यासाठी २० टक्के निर्यात शुल्क हटविणे गरजेचे आहे. तसेच श्रीलंका सरकारने कांद्यावरील आयातशुल्क २० टक्क्यांनी कमी करुन अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरु केले आहे.त्यामुळे नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा यासाठी केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने माफ करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी आपण केली आहे. आपल्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळून लवकरच आपल्या बळीराजाला दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे, असंही छगन भुजबळ यांनी या पत्रात म्हटलं आहे.

# स्वताःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करून एक हिरकणी जिंकली

## आरोग्य विभाग, सारोळेथडी ग्रामपंचायत प्रशासनाने हतबल होत घेतली माघार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत ऊसतोड कामगार, वीटभट्टी कामगार, बांधकाम कामगार व अन्य तसेच शहरातील सर्व प्रकारच्या घटकांना तसेच खेडेगावातील वाडी वस्ती पर्यंत च्या सर्व नागरीकांना आरोग्य सेवा पुरवली जाते.... विशेष म्हणजे... गरोदर मातांना पहिल्या महिन्यापासून लसीकरण केले जाते.प्रसुती व प्रसुतीपश्चात बाळ व मातेची विशेष काळजी घेतली जाते. बाळंतपणात माता मृत्यू बालमृत्यू होऊ नये यासाठी शासनाने अनेक उपाय योजना आखलेल्या आहेत.



याचाच एक भाग म्हणून बाहेर गावातील रोजगाराच्या निमित्ताने स्थलांतरित झालेले कामगारांच्या महिलांची काळजी घेण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवर असल्याने असेच एक ऊसतोड कामगार संजीवनी सहकारी साखर कारखाना कोपरगाव या कारखान्याचे नांदगाव तालुक्यातील जळगाव बुद्रूक येथील श्रावण शत्रुघ्न सोनवणे यांची पत्नी मनिषा श्रावण सोनवणे ह्याची सारोळेथडी ता. निफाड येथे एक्सप्रेस कालवा पुलाच्या बाजूला ऊसतोड कामगारांच्या अड्ड्यावरच चौथ्या वेळेस नैसर्गिक प्रसुती झाली... नैताळे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या आरोग्य सेवकांनी रुग्णवाहिका आणूनही नकार देत प्रसुती जागेवरच झाली.

प्रसुती पश्चात बाळाची तब्बेत चांगली असुन मातेच्या शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण ५ ग्रॅम असल्याने त्यांना डमिट करून रक्त भरणे आवश्यक असल्याने नाशिक सिव्हिल हॉस्पिटलमध्ये संदर्भित करावयाचे असल्याने आशा सेविका पुष्पा आव्हाड यांनी नैताळे प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे आरोग्य निरिक्षक अधिकारी भाऊसाहेब शिंदे यांना माहिती दिल्यानंतर डॉ. भाऊसाहेब शिंदे यांनी रुग्णवाहिका आणली. मात्र तीन लहान लहान मुलीच्या काळजी ने तसेच नवरा उपाशीपोटी राहिल या भीतीने स्वतः च्या उपचारासाठी नकार देत मनिषा श्रावण सोनवणे ह्या ठाम राहिल्या. त्यांना उपचारासाठी दवाखान्यात जाण्यासाठी मनोबल तयार करण्यासाठी सकाळ पासून दुपारी एक वाजेपर्यंत सारोळेथडीचे सरपंच बाळासाहेब आव्हाड ग्रामसेविका कुंदा केदारे/पगारे, आरोग्य निरिक्षक अधिकारी डॉ. भाऊसाहेब शिंदे डॉ. पुरूषोत्तम चारोटे, आरोग्य सेवक कल्पेश महाजन, श्रीमती के. आर. मोरे आरोग्य सेविका मॅडम, रूग्ण वाहिका १०२ चालक भाऊराव भवर, पत्रकार मुकुंद आव्हाड, आशा सेविका पुष्पा आव्हाड, कावेरी सुर्यवंशी सागर नागरे, उमेश सानप धनाजी नागरे यांची विनंती धुडकावत हतबल आरोग्य प्रशासन व ग्राम पंचायत प्रशासनाला परतावा लागले. अखेर लहान लेकरांच्या काळजी पोटी स्वतः च्या आरोग्यासाठी उपचार न घेणारी मातेला हिरकणी जिंकली असेच म्हणावे लागेल. का?

# संतोष देशमुख हत्या प्रकरणात कठोर व सखोल तपास करावा : अर्जुन चव्हाण

## आरोपींना तत्काळ अटक करून फास्टट्रॅक कोर्टात प्रकरण चालवावे मराठा महासंघाचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्रातील नव्हे तर मानवतेच्या मूल्यांना कलंकित करणारी घटना मस्साजोग येथील संतोष देशमुख यांच्या निर्गुण हत्येने अत्यंत हृदय द्रावक आणि राक्षस वृत्तीची असल्याचे समाज माध्यमावर पसरत आहे.

देशमुख हत्या प्रकरणात कठोर व सखोल तपास करावा तसेच आरोपींना तत्काळ अटक करून फास्टट्रॅक कोर्टात सदर प्रकरण चालवावे अशी मागणी अ.भा. मराठा महासंघाच्या वतीने निवेदनाद्वारे तहसीलदार पंढरपूर यांच्याकडे करण्यात आली आहे.

संतोष देशमुख यांना झालेल्या अमानुष मारहाणीच्या छायाचित्रांनी स्पष्ट होत आहे. कृतीपेक्षा हा भयंकर प्रकार हृदय हलवून टाकणारा आहे. त्यामुळे सर्वत्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संतोष देशमुख यांची हत्या केवळ खंडणीला विरोध केल्याने करण्यात आल्याचे पोलीस तपासा वरून लक्षात येते. संबंधित घटनेच्या मारहाण प्रकरणातील आरोपींना न्यायालयातून जामीन मिळाल्यानंतर दोन दिवसांनी शांत डोक्यांनी प्लॅनिंग करून ही हत्या केल्याने राज्यात कायदा सुव्यवस्था आहे की नाही. पोलिसांचा वचक संपला का? कोणीही यावे आणि जीव घ्यावे, एवढी हिम्मत आली कुठून असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

तहसीलदार सचिन लंगुटे यांना अखिल भारतीय मराठा महासंघाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले.



यावेळी युवक जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मोरे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष हनुमंत कदम, जिल्हा सचिव गुरुदास गुटाळ, जिल्हा उपाध्यक्ष सचिन गंगथडे, तालुका अध्यक्ष संतोष जाधव, शहराध्यक्ष अमोल पवार, युवक जिल्हा संघटक रोहित चव्हाण, महिला जिल्हाध्यक्षा प्रभावती गायकवाड, रिक्षा संघटना अध्यक्ष नागेश गायकवाड, शहर संघटक काका यादव, संत पेठ प्रमुख पांडुरंग शिंदे, शहर सचिव सचिन थिटे, युवक तालुका अध्यक्ष अमर शिंदे, कृषी तालुकाध्यक्ष औदुंबर डिसले, तसेच नानासाहेब शिंदे, मानसिंग सरदार, सोमनाथ खपाले, गणेश जगदाळे, विजय बनाली, राजेंद्र चव्हाण, किरण फाळके यांच्यासह सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्याचा धाराशिव येथे जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



धाराशिव: सुधाकर रणदिवे, देशाचे गृहमंत्री भाजप नेते अमित शहा यांनी संसदेमध्ये बोलताना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान होईल असे वक्तव्य केले आहे.

### अमित शहांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन

याच्या निषेधार्थ दि.१९ डिसेंबर रोजी सम्यक विद्यार्थी आंदोलन यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या समोर अमित शहा यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी सम्यक विद्यार्थी आंदोलन शहराध्यक्ष विवेक जाधव, रत्नदिप सोनवणे, मनोज वाघमारे, निखिल गवळी, निहार गायकवाड, वीरेंद्र झेंडे, संविधान कटारे, चेतन मस्के, स्वराज पंडागळे, धम्मानंद वाघमारे, शंकर शितोळे, गणेश कुंभार, सौरभ ओव्हाळ, वैभव कांबळे, दर्शन माळाळे, अमन शिंगाडे, शैलेश गडबडे, गौरव शिंगाडे, किशोर वाघमारे, अक्षय वाघमारे, धम्मदीप शिंगाडे,बागवान सहवाज, आर्यन कांबळे, व असंख्य भीमसैनिक उपस्थित होते.

# अमित शहा यांनी गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या असंविधानिक वक्तव्याचा निषेध शिवसेनेने गुरुवारी नोंदविला.

करीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा तसेच केलेल्या वक्तव्याबद्दल देशाची माफी मागावी, अशी मागणी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने गुरुवारी (दि.१९) केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली गुरुवारी लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना शिष्टमंडळाने निवेदन दिले या निवेदनात म्हटले आहे की भारताच्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी अमित शहा यांनी जे वक्तव्य केले ते आपल्या लोकशाही देशासाठी मोठ्या प्रमाणावर घातक आहे. तसेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी जे वक्तव्य केले आहे यावरुन असे लक्षात येते की देश हा हुकुमशाहीकडे वाटचाल करत आहे त्यामुळे देशातील तमाम लोकशाहीला मानणाऱ्या व लोकशाहीचे संवर्धन करणाऱ्या नागरिकांमध्ये तणाव व अस्वस्थता निर्माण झाली आहे. तसेच अशी वक्तव्य देशात होत राहीली तर देशामध्ये अराजकता माजल्याशिवाय राहणार नाही व देशामध्ये अशांतता निर्माण होईल, असेही निवेदनात म्हटले आहे.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या संविधानाला मानणाऱ्या सर्व देशातील नागरिकांवर अन्याय केल्यासारखे भारताचे गृहमंत्री अमित शहा यांनी उद्गार काढले आहेत. त्याम

### डॉ. बाबासाहेबांबद्दलच्या वक्तव्याचा शिवसेनेने नोंदविला निषेध

ुळे त्यांना गृहमंत्री पदावर राहण्याचा कसलाही नैतिक अधिकार राहत नाही. त्यामुळे अमित शहा यांनी त्वरीत आपल्या पदाचा राजीनामा द्यावा व देशाची माफी मागावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक जयश्री उटगे, सौ. सुनीता चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवती प्रमुख अँड. श्रध्दा जवळगेकर, युवा सेना प्रमुख दिनेश जावळे, निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, संतोष सुर्यवंशी, शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष विलास लंगर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष किशोर जाधव, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, देवणी तालुका प्रमुख मुकेश सुडे शिवाजी चव्हाण, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे अँड. रवी पिचारे, संजय उजळबे, रेखा पुजारी, दैवशाला सगर, सुनीता भोसले, सतीश शिवणे, सुनील नाईकवाडे यांच्या सह शिवसैनिकाच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या कडे केली आहे.

## लोकांमध्ये अंधश्रद्धा व गैरसमज दूर करणे बाबत अधिक जनजागृती करण्यात यावी

### सरपंच अश्विनी जाधव यांचे आवाहन

# उपजिल्हा रुग्णालय निफाड व मॅग्मो वेल्फेअर संस्था नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने विंचूर टाकळी ग्रामपंचायत येथे एड्स बाबत जनजागृती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जिल्हा रुग्णालय नाशिक जिल्हा रुग्णालय नाशिक येथील कार्यरत जिल्हा एड्स नियंत्रण विभागातील जिल्हा कार्यक्रम अधिकारी योगेश परदेशी यांच्या आदेशान्वये व उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील डॉ. राजीव तांभाळे यांच्या मार्गदर्शनाखाली एच आय व्ही/एड्स आजाराबाबत जनजागृती करण्यात आली.

चरसो वेल्फेअर संस्था नाशिक येथील कार्यरत लिंक वर्कर यांनी विंचूर टाकळी, लासलगाव ता. निफाड जिल्हा नाशिक येथे सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत समुपदेशक नितीन परदेशी यांनी उपस्थित ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच ग्रामसेवक व ग्रामस्थ यांना एच आय व्ही/ एड्स आजार होण्याचे कारणे, समज, गैरसमज, उपाय, टोल फ्री क्रमांक १०९७ व औषधपचार सविस्तरपने माहिती दिली. असून केंद्र व राज्य सरकार यांनी एच आय व्ही व एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, २०१७ केला आहे याबाबात पुढील प्रमाणे माहिती दिली आहे. हा कायदा एचआयव्ही/ एड्सशी संबंधित लोकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी एचआयव्ही व एड्स (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, २०१७ लागू करण्यात आला. यामध्ये एड्सबाधित व्यक्तींसाठी वैद्यकीय सेवा, सामाजिक हक्क, आणि भेदभावाविरुद्ध संरक्षण यावर भर दिलेला आहे. या कायद्याचे मुख्य मुद्दा म्हणजे एच आय व्ही बाधित रुग्रा बाबत होणाऱ्या भेदभावाविरुद्ध असलेले संरक्षण होय म्हणजेच एचआयव्ही/एड्सबाधित व्यक्तींना शिक्षण मिळणे, रोजगार मिळणे, आरोग्य सेवा मिळणे, सार्वजनिक सुविधा इत्यादी क्षेत्रांमध्ये भेदभाव होऊ नये तसेच एचआयव्हीचा आधार घेऊन कोणत्याही व्यक्तीला कामावरून काढणे किंवा प्रवेश नाकारणे बेकायदेशीर ठरते, एचआयव्ही संक्रमित व्यक्तींच्या वैद्यकीय तपशीलाची गोपनीयता राखणे आवश्यक आहे.

यानंतर लिंक वर्कर कार्यक्रमातील अमित साळवे यांनी याबाबात सांगितले की व्यक्तीच्या संमतीशिवाय त्यांची एचआयव्ही स्थिती कोणालाही सांगता येत नाही, एचआयव्ही चाचणीसाठी संमती आवश्यक आहे,कोणत्याही व्यक्तीची एचआयव्ही चाचणी केवळ त्यांच्या लेखी संमतीनेच होऊ शकते यामध्ये १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी पालक किंवा कायदेशीर पालकाची परवानगी आवश्यक आहे.एड्सबाधित व्यक्तींना मोफत उपचार, तांत्रिक मदत आणि औषधोपचार मिळावा.

शेवटी विंचूर टाकळी ग्रामपंचायतचे सरपंच अश्विनी जाधव यांनी मनोगतात सांगितले की, सरकारने यासाठी वेळोवेळी उपाययोजना कराव्यात आणि संसर्ग रोखण्यासाठी कार्यक्रम राबवावे तसेच एड्सबाधित महिलांसाठी गर्भधारणा काळात विशेष काळजी व सुविधा दिली जावी व एड्सबाधित बालकांना शिक्षण आणि वैद्यकीय हक्क मिळावे.एड्सबाधित व्यक्तींनी भेदभावाचा सामना केल्यास राज्यस्तरीय किंवा जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीसमोर आपली तक्रार दाखल करू शकतात. सार्वजनिक आरोग्य विभाग व निमशासकीय संस्था कडून एड्सचा प्रसार, प्रतिबंध आणि उपचार याबाबत लोकांमध्ये अंधश्रद्धा व गैरसमज दूर करणे बाबत अधिक जनजागृती करण्यात यावी असं अहवान केले.

याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितिन शिरसाठ तर आभार ज्योती भोर मानले, याप्रसंगी विंचूर टाकळी ग्रामपंचायत सरपंच अश्विनी राजेश्वर जाधव, उपसरपंच वर्षा संजय काळे, ग्रामसेवक नितिन शिरसाट, अमित साळवे, ज्योती भोर, लिंक वर्कर ज्योती कुमावत ग्रामस्थ उपस्थित होते.